( **<u>सभापतीस्थानी : माननीय सभापती</u>** )

**पृ.शी./मु.शी.: नियम 289 च्या सूचने संबंधी**

**सभापती** : माननीय विरोधी पक्षनेते श्री. पांडुरंग फुंडकर व माननीय सदस्य सर्वश्री दिवाकर रावते, नितीन गडकरी, अरविंद सावंत,विनोद तावडे, डॉ.दीपक सावंत, श्री. मधुकर चव्हाण, श्रीमती डॉ. नीलम गोऱ्हे, माननीय सदस्य सर्वश्री संजय केळकर, अनिल परब, किरण पावस्कर, चंद्रकांत पाटील, परशुराम उपरकर यांनी "दिनांक 26 नोव्हेंबर, 2008 रोजी मुंबईवर झालेल्या दहशतवादी हल्ल्यासंदर्भात नेमलेल्या राम प्रधान समितीचा अहवाल शासनाने प्रथम विधीमंडळाला सादर करणे आवश्यक असतांना तो विधीमंडळात सादर न करता दिनांक 17 जून, 2009 रोजी त्या अहवालावरील कार्यवाही अहवाल विधीमंडळात सादर केलेला आहे, तसेच सभागृहातील अनेक सदस्यांनी मूळ अहवाल सभागृहात सादर करण्याची आग्रही मागणी केलेली असतांना देखील आजपर्यंत सदर अहवाल सभागृहात सादर झालेला नाही, तसेच सभागृहात सादर न झालेला हा अहवाल सभागृहाबाहेर वर्तमानपत्रे, दूरदर्शन आदी प्रसिध्दी माध्यमांमध्ये सहजगत्या उपलब्ध झालेला आहे, तसेच हा अहवाल फुटल्यासंदर्भात अनेक वरिष्ठ पोलीस अधिकारी परस्परांवर गंभीर स्वरुपाचे आरोप करीत आहेत आणि त्यामुळे पोलीस दलातील गटबाजी उघडकीस आलेली आहे, तसेच या सर्व परिस्थितीमुळे राज्यातील सर्वसामान्य जनता धास्तावलेली, चिंताग्रस्त व संभ्रमावस्थेत आहे." या विषयावर नियम 289 अन्वये प्रस्ताव दिला आहे. त्या संदर्भात माननीय विरोधी पक्षनेत्यांनी आपले म्हणणे थोडक्यात मांडावे.

श्री. पांडुरंग फुंडकर (विरोधी पक्षनेता) : सभापती महोदय, दिनांक 26.11.2008 रोजी मुंबईवर दहशतवादी अतिरेक्यांनी जो हल्ला केला. त्या संदर्भात शासनाने नेमलेल्या राम प्रधान समितीचा अहवाल शासनाने मागील अधिवेशनामध्ये विधीमंडळापुढे सादर केला नाही. आम्ही त्या संदर्भात आग्रही मागणी केल्यानंतर तो अहवाल सभागृहापुढे न ठेवता "ॲक्शन टू बी टेकन"

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

असुधारित प्रत / परिक्षेसाठी नाही

श्री. पांडुरंग फुंडकर....

म्हणजे त्या अहवालावरील कारवाईची प्रत आम्हाला देण्यात आली. तो अहवाल महत्वाचा असतांना आणि या सभागृहामध्ये राम प्रधान समिती गठीत झाली असतांना त्या समितीचा अहवाल सभागृहापुढे ठेवावयास पाहिजे होता. मागील अधिवेशनामध्ये माननीय मुख्यमंत्र्यांनी कबूल केले होते की, पुढील अधिवेशनामध्ये हा अहवाल सभागृहापुढे ठेवण्यात येईल. परंतु विधानपरिषदेमध्ये हा अहवाल ठेवण्यापूर्वीच तो लिक झाला. राम प्रधान समितीचा हा अहवाल माननीय मुख्यमंत्री, मुख्य सचिव आणि गृह विभागाच्या सचिवांच्या ताब्यात होता. या चार लोकांशिवाय तो अन्य कुणालाही माहीत नव्हता. कालपर्यंत माननीय मुख्यमंत्र्यांनी जाहीरपणे सांगितले होते की, हा अहवाल बाहेर गेला नाही.परंतु काल-परवा काही वृत्त वाहिन्यांवरुन हा अहवाल प्रसिध्द करण्यात आला. इतकेच नव्हेतर वेबसाईटवरुन हा अहवाल जगभर पोहोचला. त्यामुळे हा अहवाल कुणीही पाहू शकतो. यामुळे राम प्रधान समितीचीच नाहीतर या महाराष्ट्राची व या राज्य सरकारची नाचक्की झाली आहे. कदाचित माननीय मुख्यमंत्री सांगतील की, सुप्रिम कोर्टाने हा अहवाल सभागृहापुढे ठेवावयाचा नाही असे सांगितले आहे. हे जरी खरे असले तरी हा अहवाल महाराष्ट्राच्या काना-कोपऱ्यातील प्रत्येक माणसाच्या हातामध्ये गेला. या अहवालामध्ये अत्यंत गंभीर बाबी अंतर्भूत आहेत. त्यामुळे जनतेमध्ये धास्तावलेले वातावरण तयार झाले आहे. हे अधिवेशन सुरु असतांना या अहवालावर चर्चा होणे गरजेचे आहे.महाराष्ट्राच्या सुरक्षेच्या दृष्टीने, या देशाच्या व राज्याच्या अंतर्गत सुरक्षेच्या दृष्टीने ही चर्चा होणे अत्यंत महत्वाचे आहे. प्रत्येक माणसाच्या मनामध्ये भिती निर्माण झाली आहे. गेल्या वर्षी सागरी मार्गाने मुंबईवर हल्ला करण्यात आला. त्याबाबत सरकारला माहिती असतांनासुध्दा कोणत्याही प्रकारची जबाबदारी शासनाने घेतली नाही. आणि आता तर हवाई मार्गाने हल्ला होण्याची शक्यता असल्याची माहिती आहे. अशा परिस्थितीत हे महाराष्ट्र शासन काय करीत आहे? याबद्दल जनतेच्या मनामध्ये संभ्रम आहे. त्यामुळे सभागृहापुढील सर्व कामकाज बाजूला सारुन या विषयावर चर्चा झाली पाहिजे, आणि महाराष्ट्रातील 10 कोटी जनतेला आश्वस्त केले पाहिजे. हल्ल्याच्या संदर्भात सर्व बारकावे जनतेसमोर आले पाहिजेत. त्या संदर्भात सर्व कामकाज बाजूला सारुन राम प्रधान समितीच्या अहवालावर चर्चा होणे आवश्यक आहे अशी मी विनंती करतो.

---

09-12-2009 ( असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही ) A 3

DGS/ KGS/ MMP/

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. नितीन गडकरी (नागपूर विभाग पदवीधर) : सभापती महोदय, सन्माननीय विरोधी पक्षनेत्यांनी याठिकाणी मांडलेल्या नियम 289 अन्वये प्रस्तावावर आज चर्चा झाली पाहिजे याकरिता या प्रस्तावाला माझे अनुमोदन देत आहे. सभापती महोदय, माननीय विरोधी पक्षनेत्यांनी मांडलेल्या मुद्यापेक्षा माझा वेगळा मुद्दा आहे. मी काल सभागृहामध्ये नव्हतो, आज पहिल्यांदा आलो आहे. या ठिकाणी येत असतांना सकाळी पावणे दहाच्या सुमारास मला एक व्यक्ती भेटली. तिने पांढरा शर्ट आणि पांढरी पँट परिधान केली होती.

(यानंतर सौ.रणदिवे)

अप्रकाशित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

APR/ MMP/ KGS/ 11:05

श्री.नितीन गडकरी . . . .

त्यांनी माझ्या हातामध्ये एक प्रत दिली आणि सांगितले की, साहेब, हा प्रधान समितीचा अहवाल घ्या. त्यावर मी त्यांना म्हटले की, आपण इकडे या, इकडे या. तर तो माणूस पळून गेला. शेवटी मी माझ्या पी.ए.ला सांगितले की, त्या माणसाला आवाज दे. त्याचा हात धर. त्याप्रमाणे पी.ए.ने त्याचा हात धरल्यावर त्याला विचारले की, हे काय आहे ? तर तो म्हणाला की, भुजबळसाहेबांनी तुमच्याकडे हा कागद दिलेला आहे. तुमचे नाव सांगितले आणि मी जेव्हा . . . .

श्री.छगन भुजबळ : सभापती महोदय, . . . .

श्री.नितीन गडकरी : सभापती महोदय, त्या माणसाने मला काय सांगितले, ते मी सांगत आहे. मला तुमच्यावर काही ॲलिगेशन करावयाचे नाही.

श्री.छगन भुजबळ : सभापती महोदय, अगदी पहिल्या दिवसापासून या अहवालाच्या ज्या काही प्रती आहेत, त्यातील एकही प्रत माझ्याकडे आलेली नाही. माननीय मुख्यमंत्र्यांना देखील त्याची कल्पना आहे. त्यामुळे तुम्ही अशा प्रकारे उगीच नावे घेऊन संभ्रम निर्माण करण्याचा प्रयत्न करु नका. माझ्याकडे पहिल्या दिवसापासून अहवालाची प्रत नाही आणि तो मी वाचलेला सुध्दा नाही. तसेच माझ्याकडे जर अहवाल असता, तर मी तो तुम्हाला कधीच दिला नसता.

श्री.नितीन गडकरी : सन्माननीय उप मुख्यमंत्री महोदय, मी आपल्याला काही बोललो असेन तर मी तुमची क्षमा मागतो. तुम्ही इतके ट्रान्सपेरन्ट आहात आणि इतके प्रखर आहात की, तुम्ही प्रामाणिकपणे माननीय मुख्यमंत्र्यांच्या समोर हे कबूल केले की, मला माहिती नाही, मी अहवाल वाचलेला नाही, मला काही देणे-घेणे नाही, माझा काही संबंध नाही, त्यामुळे माझे नाव कशासाठी घेत आहात ? तुमचे एकदम बरोबर आहे. तुमच्यावर माझा 99 टक्के नाही तर 101 टक्के विश्वास आहे. तुमची बदनामी करण्याचा प्रश्नच उद्‌भवत नाही. पण या सभागृहात आणि सभागृहाच्या बाहेर आणि मिडियामध्ये काही बाह्य शक्ती दिशाभूल करुन तुम्हाला बदनाम करण्याचा प्रयत्न करीत आहेत. तुम्ही आमच्या सभागृहाचे नेते आहात. तुमची बदनामी होऊ नये म्हणून तुमच्या हितासाठी मी हा विषय उपस्थित केलेला आहे.

सभापती महोदय, माझा एक मार्काचा साधा प्रश्न आहे. याबाबतीत वर्तमानपत्रामध्ये, टी.व्ही. वर कशासाठी चर्चा सुरु आहे? याठिकाणी सदनामध्ये माननीय मुख्यमंत्री उपस्थित आहेत. आम्ही मागील अधिवेशनामध्ये हा विषय उपस्थित केला होता, तेव्हा त्यांनी या सभागृहामध्ये जे वाक्य .....

. . . .बी-1



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.नितीन गडकरी . . . .

उच्चारलेले आहे, त्याची मला आठवण होते. त्यांनी असे सांगितले होते की, हा अहवाल माझ्या कस्टडीमध्ये आहे. तो कोणालाही मिळू शकत नाही. हा अहवाल कोणी वाचू शकत नाही, हा अहवाल कॉन्फिडेन्शिअल आहे आणि तो कोणाकडेही जाऊ शकत नाही. मला त्यांचे ते भाषण रेकॉर्डवर आणावयाचे आहे. सभापती महोदय, आपल्या समोर ते बोललेले आहेत, आपण सदरहू भाषण काढून पहावे. सभापती महोदय, हा आपला अपमान नाही काय ? पण अजून अपमान झ ालेला नाही. कारण हे सर्व खोटे असेल तर सगळे बाहेर निघेल.बिचारे माननीय मुख्यमंत्री देखील माननीय उप मुख्यमंत्री श्री.छगन भुजबळ साहेबांसारखे ट्रान्सपेरन्ट आहेत.त्यांचा काही संबंध येत नाही. पण जर ही बाब खरी असेल तर प्रश्न निर्माण होत आहे. या विषयाच्या बाबतीत वर्तमानपत्रामध्ये उगीचच चर्चा सुरु आहे, सभागृहामध्ये चर्चा सुरु आहे. कशासाठी ? सभापती महोदय, मी आपल्याकडे ही प्रत देतो, आपण ती माननीय मुख्यमंत्र्यांना द्यावी. माझा केवळ एका मार्काचा साधा प्रश्न आहे. माझ्याकडे अहवाल आहे. पण हा अहवाल खोटा आहे की हा अधिकृत अहवाल नाही याबाबतीत आपण खुलासा करावा आणि मग आपण हा विषय संपवू या. याबाबतीत वेगळया मार्गाने चर्चा उपस्थित करु या. त्यात काय आहे ? पण तुमच्या एका सहकाऱ्याचे नाव घेऊन माझ्याकडे अहवाल देण्यात आला आहे. तेव्हा मला मिळालेली प्रत खरी आहे की खोटी आहे? बरे, केवळ मलाच ही प्रत दिली नाही, तर ही प्रत मिडियाला दिली. आपल्या मंत्रिमंडळामध्ये श्री.राजेंद्रबाबू दर्डा हे माननीय मंत्री आहेत आणि त्यांचे "आयबीएन-लोकमत" हे चॅनेल आहे. ते मंत्री आहेत आणि त्यांनीही गुप्ततेची शपथ घेतलेली आहे. मात्र त्यांच्या वाहिनीवरुन तर हा अहवाल दाखवत होते. या सदनामध्ये ज्याच्याबद्दल घोषणा झाली होती, ती प्रॉपर्टी कोणाची आहे ? How anyone has right to declare anything about the Report out of this House? सभापती महोदय, हा तुमचा अपमान आहे, आमचाही अपमान आहे. ही बाब खरी असेल तर याबाबतीत उत्तर दिले पाहिजे आणि जर हे खोटे असेल तर माननीय उप मुख्यमंत्री श्री.छगन भूजबळसाहेब मी तुमची दिलगिरी व्यक्त करतो, क्षमा मागतो. माननीय मुख्यमंत्र्यांची क्षमा मागतो. आम्हाला कोणीतरी फसविले आहे असे सांगेन. माझे म्हणणे मागे घेतो आणि आपण दुसऱ्या विषयाकडे जाऊ. माझा केवळ एक मार्काचा प्रश्न आहे की, हा अहवाल खरा आहे की खोटा आहे महाराष्ट्रामध्ये या विषयाच्या संबंधात प्रेसमध्ये लिहीले जात आहे,सदनामध्ये चर्चा होत आहे, वाद

. . . .बी-3





असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.नितीन गडकरी . . . .

निर्माण होत आहेत, पोलीसवाले भांडत आहेत, अधिकारी भांडत आहेत. काँग्रेस आणि राष्ट्रवादी काँग्रेसमध्ये सुंदोपसुंदी सुरु आहे. एकाने सांगितले की, हे माननीय श्री.छगन भुजबळसाहेबांनी प्रसिध्दीसाठी दिले आहे जेणेकरुन त्यांना माननीय मुख्यमंत्री श्री.अशोक चव्हाणसाहेबांना अडचणीमध्ये आणावयाचे आहे. कोणी असे सांगतात की, हे माननीय मुख्यमंत्री श्री.अशोक चव्हाण साहेबांनी दिले आहे, कारण राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचा उप मुख्यमंत्री आहे म्हणून त्यांना माननीय उप मुख्यमंत्री श्री.छगन भुजबळ यांना अडचणीमध्ये आणावयाचे आहे. कारण ते अशा प्रकारे बाहेर तुमच्याबद्दल चर्चा होणे, अशा प्रकारचे प्रवाद होणे बरोबर नाही. तुम्ही फार ट्रान्सपेरन्ट आहात. कॉन्फिडेन्शिअल आहात.तुमच्या कस्टडीमध्ये रिपोर्ट होता.माननीय मुख्यमंत्र्यांनी तो रिपोर्ट कोणालाही दिला नाही, माझ्या पी.ए.ला देखील दिला नाही.मग माझ्याजवळ जो अहवाल आहे, तो खरा आहे की खोटा आहे. माझा एक मार्काचा साधा प्रश्न आहे की, हा अहवाल खरा आहे की खोटा आहे ? माननीय मुख्यमंत्र्यांना अधिकार आहे आणि त्यांनी असे सांगावे की,सन्माननीय सदस्य श्री.नितीन गडकरी यांनी दिलेला अहवाल खोटा आहे, मग विषय संपला. त्यानंतर या चर्चेच्या बाबतीत आपणास जो निर्णय घ्यावयाचा आहे तो घ्यावा. सभापती महोदय, मी आपल्याकडे हा अहवाल देतो. या अहवालामुळे महाराष्ट्रावर परिणाम झालेले आहेत आणि जर ही बाब खरी असेल तर सभागृहाचा अपमान झाला आहे, आपला अपमान झालेला आहे आणि आमचाही अपमान झाला आहे. राम प्रधान समिती सभागृहामध्ये जाहीर झालेली आहे, सभागृहाच्या बाहेर नाही. मग त्या समितीचा अहवाल प्रथम सभागृहासमोर ठेवावयास पाहिजे की "आयबीएन-लोकमत" किंवा इतर वाहिन्यांवर ऐकून आम्हाला समजणार आहे? या लोकशाहीमध्ये अशा प्रकारे सभागृहाचे कामकाज चालणार आहे काय? हे सभागृह कसे चालणार आहे? आम्ही त्यांच्याकडून माहिती घेऊन मग सभागृहामध्ये बोलावयाचे काय ?

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

यानंतर कु.थोरात . . . .

श्री. नितीन गडकरी..

या सभागृहात जाहीर झालेल्या समितीचा अहवाल आम्हाला मिळण्याचा अधिकार नाही काय? सभापती महोदय, हा एका मार्काचा प्रश्न आहे. राम प्रधान समितीचा अहवाल फुटला हे खरे की खोटे याचा खुलासा आजच्या आज झाला पाहिजे. माननीय मुख्यमंत्री सभागृहात आहेत. हा सूर्य आणि हा जयद्रथ. दूध का दूध, पानी का पानी. नेमके काय आहे? याबाबत होय की नाही ते सांगावे आणि मग पुढे चर्चा करावी. नाही तर याला अर्थ रहाणार नाही. सभागृहात या विषया बरोबर अनेक गोष्टींची चर्चा होते, सरकारबद्दल वाईट चर्चा होते ती होता कामा नये, कारण त्यामध्ये आमचा अवमान आहे. आमच्या लोकशाही हक्काचे संरक्षण करणे ही शासनाची जबाबदारी आहे. सभापती माहोदय, आपल्यासमोर सभागृहात जाहीर झाले मग हा अहवाल आला कुठून? याला कोण जबाबदार आहे? हा अहवाल कोणी फोडला? हे आम्हाला कळायला पाहिजे. मी हा अहवाल आपल्याला देतो. आपण त्याबद्दल माननीय मुख्यमंत्र्यांना विचारावे आणि होय की नाही ते सांगावे. नाही तर भुजबळसाहेबांची बदनामी होईल. ते माझे चांगले मित्र आहेत. त्यांचे काही घेणे नाही, देणे नाही, "खाया-पिया कुछ नही, ग्लास फोडा आठ आनेका" अशी त्यांची अवस्था झाली आहे. त्यांना अहवाल माहीत नाही, त्यांनी तो वाचला नाही, त्यांना कोणी विचारत नाही, बोलत नाही. उपमुख्यमंत्री म्हणून त्यांच्याबद्दल कोणाला काही घेणे-देणे नाही. सगळे कॉंग्रेसच्या खात्यात गुप्त आहे. बिचारे, त्यांची कुचंबना होत आहे. त्यांना अहवालही माहीत नाही, पुन्हा वरुन ते बदनाम. हे कशा करिता? याबाबतचा खुलासा आज झाला पाहिजे. हे सत्य आहे की असत्य आहे, हे सभागृहाला कळले पाहिजे.

श्री. दिवाकर रावते :सभापती महोदय, सभागृहाचे सर्व कामकाज थांबवून नियम 289 अन्वये जो प्रस्ताव देण्यात आलेला आहे त्यावर तातडीने चर्चा करण्यात यावी याचे समर्थन करण्यासाठी मी या ठिकाणी उभा आहे. सभापती महोदय, या सदनामध्ये आम्ही सर्व सदस्य निवडून येतो त्यावेळी आपापल्या धर्माप्रमाणे शपथ घेतो. पण आज आम्हाला प्रधान समितीचा अहवाल हातात घेऊन आपल्यासमोर बोलण्याची वेळ आलेली आहे. हा अहवाल कसा फुटला, कुठून आला, काय आला? या अधिवेशनाच्या सुरुवातीला प्रधान समितीचा अहवाल फुटला हा विषय सभागृहात उपस्थित करण्यात येणार आहे असे विरोधी पक्षांनी जाहीर केल्यानंतर माननीय

..2..



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. दिवाकर रावते. . .

मुख्यमंत्री महोदयांनी वर्तमानपत्राच्या माध्यमातून असे सांगितले की, "असा कुठलाही अहवाल फुटलेला नाही. मला कुठलाही अहवाल मिळालेला नाही मला त्या अहवालाची माहिती नाही. जे माहीत नाही त्यावर मी कसे मत व्यक्त करु" त्यामुळे मी आणि विधानसभा सभागृहाचे गटनेते श्री. सुभाष देसाई, आम्ही दोघांनी जाऊन माननीय मुख्यमंत्री महोदयांना तो अहवाल सादर केला. त्यामुळे यापुढे तरी तो अहवाल मला मिळाला नाही असे त्यांना म्हणता येणार नाही. त्यामुळे अहवाल फुटला हे खरे की खोटे हे सांगण्याची आपली एक अडचण आम्ही दूर केली आहे. सभापती महोदय, हा विषय एवढयाचसाठी गंभीर आहे की, आम्ही ज्यावेळी माननीय मुख्यमंत्र्यांना भेटलो त्यावेळी माननीय श्री. आर.आर.पाटीलसुध्दा तेथे होते. त्या सगळयांच्यासमोर त्यांनी प्रामाणिकपणे सांगितले की, "तो अहवाल बाहेर जाऊ शकत नाही, तो चार जणांच्या कस्टडीत आहे." त्या चार जणांची नावेही त्यांनी सांगितलेली आहेत. ती नावे आता ते या सभागृहात रेकॉर्डवर आणतील. गेल्या नागपूर अधिवेशनात या दहशतवादी हल्याच्या संदर्भात मोठा गदारोळ झाला होता. आम्ही यासंदर्भात न्यायालयीन चौकशीची मागणी करीत होतो पण शासनाने अधिवेशनाच्या शेवटच्या दिवशी शेवटच्या पंधरा मिनिटांच्या अगोदर राम प्रधान चौकशी समिती जाहीर केली. आमचे वादळ व्यक्तिगत कोणाबद्दल नव्हते तर आमचे वादळ झालेल्या घटनेचे गांभीर्य या देशाला कळावे या संदर्भात होते. तो संदर्भही तुम्ही व्यक्तिगत घेतला त्याबद्दल आम्ही काही म्हणत नाही. पण गेल्या अधिवेशनात ज्यावेळी या अहवालाच्या संदर्भात सभापती महोदय, आपल्यासमोर माननीय मुख्यमंत्र्यांनी सांगितले की, हा अहवाल देतो आणि त्यावरील ॲक्शन टेकन रिपोर्टही देतो. त्याप्रमाणे ॲक्शन टेकन रिपोर्ट देण्यात आला नाही तर ॲक्शन टू बी टेकन अहवाल सादर केला आहे. आमचे काय म्हणणे होते? सभागृहाला अहवाल सादर करण्यात यावा असेच आमचे म्हणणे होते. पण आम्हाला सभागृहाच्या बाहेर पाठविण्यात आले आमच्या कडून असे काय घडले होते की, आम्हाला सभागृहाच्या बाहेर जावे लागले. तीन मंत्री गेले आणि तीन सदस्यही गेले. या तीन-तीन जणांचा एनकाऊंटर झाला. हे सगळे आम्ही भोगल्यानंतर तो अहवाल प्राप्त होणे हा आमचा अधिकार नाही काय? हा अहवाल देणार की नाही? तो अहवाल टेबल झाला पाहिजे, आता तो अहवाल आला आहे तर आम्हाला त्यावर चर्चा तरी करु द्या. हा विषय अत्यंत गंभीर आहे. बाहेर पोलीस एकमेकांच्या उरावर बसलेले आहेत. एकमेकांची झडती घेत आहेत.

..3..



SMT/ KGS/ MMP/

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. दिवाकर रावते. . . .

आज पोलीस विभागातील परिस्थिती इतकी गंभीर आहे की, पोलीस एकमेकांचे संरक्षण करु शकत नाहीत तर ते आमचे संरक्षण काय करणार? असा प्रश्न निर्माण झालेला आहे. एवढा हा गंभीर विषय आहे.सन्माननीय श्री. गडकरीसाहेब म्हणाले की, सरकार सुध्दा बदनाम होता कामा नये. त्यांना स्वत:होऊन बदनाम होण्याची हौस असेल तर आपण कशाला थांबवायचे. म्हणून या विषयावर सविस्तर चर्चा मान्य करण्यात यावी, त्यावेळी आम्ही या विषयी सविस्तर बोलू. हे प्रकरण एवढे गंभीर आहे की, यासंदर्भात आम्हाला सुध्दा सोसावे लागले आहे. तीन मंत्र्यांना त्यांची मंत्रीपदे गमवावी लागली आहेत.

यानंतर श्री. बरवड....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. दिवाकर रावते ...

आणि यातून अशा अनेक गोष्टी बाहेर आलेल्या आहेत. मिडियाच्या माध्यमातून जनतेमध्ये त्याची चर्चा चालू झालेली आहे. हा अहवाल जागतिक पातळीवर गेलेला आहे. हा अहवाल वेबसाईटवर आलेला आहे. त्यामुळे कोणासाठी काय लपवित आहात हे तरी आम्हाला कळू द्या. आपण जर सर्वोच्च न्यायालयामध्ये असे सांगितले असेल की, हा अहवाल बाहेर काढणे अत्यंत घातक आहे तर आता कोणती घातकता निर्माण झालेली आहे, हे आम्हाला कळले पाहिजे. म्हणून सभागृहाचे आजचे सर्व कामकाज थांबवून तातडीने या अहवालावर चर्चा होणे अत्यंत आवश्यक आहे आणि तशा प्रकारची आग्रहाची विनंती मी आपल्याकडे करतो.

**सभापती** : सन्माननीय सदस्य सर्वश्री पांडुरंग फुंडकर, नितीन गडकरी, दिवाकर रावते...

श्री. नितीन गडकरी : सभापती महोदय, हा अहवाल खरा आहे की, खोटा आहे याबाबत माननीय मुख्यमंत्र्यांनी सांगावे.

श्री. अशोक चव्हाण : सभापती महोदय, सन्माननीय सदस्य श्री. नितीनजी गडकरी आणि अन्य सहकाऱ्यांनी या ठिकाणी प्रधान समितीच्या अहवालाच्या संदर्भामध्ये अतिशय उत्तम युक्तिवाद केलेला आहे. म्हणजे आम्ही रेकॉर्डवर काय बोललो याबाबत बऱ्याच गोष्टी त्यांनी सांगितल्या. मागच्या अधिवेशनाच्या कालावधीमध्ये या अहवालाच्या संदर्भामध्ये शासनाने आपली भूमिका स्पष्ट केलेली आहे. या अहवालातील जो महत्वाचा मजकूर आहे तो आम्ही दोन्ही सभागृहाच्या पटलावर ठेवलेला आहे आणि त्यावर त्यावेळी बऱ्याचअंशी चर्चाही झालेली आहे. या अहवालामधील मुद्दे आणि त्या अनुषंगाने अपेक्षित कारवाई या दोन्ही गोष्टी त्यावेळी सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आलेल्या होत्या. मागच्या कालावधीत त्यासंदर्भात चर्चाही झाली. प्रधान समितीच्या संदर्भामध्ये किंवा 26/11 च्या बाबतीमध्ये या अनुषंगाने ज्या अनेक गोष्टी सभागृहासमोर आल्या त्यासंबंधी चर्चा झाली. शासनाने कोणतीही गोष्ट लपवून ठेवण्याचा अजिबात प्रयत्न केलेला नाही. या अहवालाच्या बाबतीत ज्या गोष्टी पूर्णपणे दिलेल्या नाहीत त्यामध्ये एक तर मुंबईमध्ये चालू असलेला जो न्यायालयीन खटला आहे तो त्यातला एक भाग होता आणि त्या अनुषंगाने याचा त्याच्यावर विपरित परिणाम होता कामा नये ही भूमिका शासनाने सभागृहात स्पष्ट केलेली होती. त्यामुळे लपविण्याचा

...2...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. अशोक चव्हाण .....

किंवा पूर्णपणे अहवाल न देण्याचा असा काही शासनाचा हेतू नव्हता. ज्या काही गोष्टी देणे आवश्यक आहे, सभागृहाला माहिती होणे आवश्यक आहे त्या माननीय गृहमंत्र्यांनी सभागृहाला सादर केलेल्या आहेत. सभापती महोदय, सन्माननीय सदस्यांनी आज आपल्याकडे जो अहवाल सादर केला आहे आणि जो अहवाल फुटल्याचा दावा या ठिकाणी केला जात आहे याबाबत मी काल-परवाच म्हणालो होतो की, आम्हाला त्याची प्रत द्या. काल ही प्रत त्यांनी माझ्याकडे आणून दिलेली आहे. ती प्रत मी काल माननीय गृह मंत्र्यांकडे सुपूर्द केलेली आहे आणि ती प्रत आणि मूळ अहवाल हा सुसंगत आहे की नाही हे पाहून घ्या असे मी त्यांना सांगितले. तसे जर असेल तर सभागृहाला आपली भूमिका सांगता येईल.

( विरोधी पक्षाचे काही सन्माननीय सदस्य एकदम बोलण्याचा प्रयत्न करतात )

डॉ. दीपक सावंत : आपल्याला किती वेळ लागणार आहे ?

श्री. अशोक चव्हाण : आपण कालच मला ही माहिती दिलेली आहे. म्हणून आपण दिलेली प्रत आणि मूळ अहवाल या अनुषंगाने मला स्पष्टपणे सभागृहाला सांगावयास हरकत नाही की, आमच्याकडे असलेल्या चारही प्रती....

श्री. नितीन गडकरी : सभापती महोदय, हा अहवाल फक्त आपल्या प्रतिष्ठेकरिता, माननीय उपमुख्यमंत्री श्री. छगन भुजबळ साहेबांच्या ...

श्री. अशोक चव्हाण : यामध्ये कोणाच्याही प्रतिष्ठेचा विषय नाही आणि आपण माननीय भुजबळ साहेबांची काळजी करु नका. आमचे काम समन्वयाने चालू आहे. आपण काही काळजी करु नका.

( विरोधी पक्षाचे अनेक सन्माननीय सदस्य एकदम बोलण्याचा प्रयत्न करतात )

श्री. अशोक चव्हाण : सभापती महोदय, या ठिकाणी माझी बाजू ऐकून घेतली जात नाही. मी सन्माननीय सदस्यांचे म्हणणे ऐकून घेतलेले आहे. मला माझी बाजू मांडू द्यावी. मुद्दा एवढाच मर्यादित आहे की, ....

**सभापती** : सन्माननीय सदस्यांनी कृपया खाली बसावे.

...3...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

RDB/ MMP/ KGS

श्री. दिवाकर रावते : सभापती महोदय, मी आपल्यामार्फत विनंती करतो की, हे तपासण्यासाठी पाहिजे तर एक समिती नेमावी .....

श्री. अशोक चव्हाण : सभापती महोदय, माझ्याकडे काल त्यांनी अहवालाची एक प्रत आणून दिलेली आहे. त्याची शहानिशा करण्याकरिता ती प्रत मी माननीय गृह मंत्र्यांकडे सुपूर्द केलेली आहे. मला हे सांगितले पाहिजे की, आमच्याकडे असलेल्या ज्या प्रती आहेत, त्या चारच प्रती होत्या, त्या प्रतीचा आणि याचा काही संबंध नाही हे मी ऑथेंटिकली रेकॉर्डवर सांगू इच्छितो. या अहवालाचा आणि त्या प्रतीचा अजिबात काही संबंध नाही. माझ्याकडे ज्या प्रती आहेत त्याचा आणि याचा संबंध नाही. त्याच्या कोणत्याही झेरॉक्सेस किंवा काही झालेले नाही. मुद्दा एवढाच आहे की, त्यांनी दिलेली जी प्रत आहे ती आणि त्यातील मजकूर हा सुसंगत आहे की नाही हे माननीय गृहमंत्री तपासतील आणि सभागृहात निवेदन करतील.

( विरोधी पक्षाचे अनेक सदस्य एकदम बोलण्याचा प्रयत्न करतात )

**सभापती** : नियम 289 अन्वये या ठिकाणी जो प्रस्ताव आलेला आहे त्या प्रस्तावाच्या संदर्भातील माझा निर्णय मी आता या ठिकाणी जाहीर करीत आहे. आजच्या कामकाजपत्रिकेमध्ये या अनुषंगाने कोणताही विषय नाही. काल सुध्दा सन्माननीय सदस्य श्री. जयंत प्र. पाटील यांनी याच पध्दतीचा नियम 289 अन्वये एक प्रस्ताव दिला होता.

( विरोधी पक्षाचे अनेक सन्माननीय सदस्य वेलमध्ये येऊन माननीय सभापतींच्या आसनासमोर जमून घोषणा देतात )

यानंतर श्री. खंदारे.....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

( विरोधी पक्षाचे काही सन्माननीय सदस्य वेलमध्ये जमून घोषणा देतात. )

**सभापती**.......

त्यावेळी सुध्दा त्यांनी प्रश्नोत्तराचा तास स्थगित करण्यात यावा अशी विनंती केली होती. पण काल देखील मी सन्माननीय सदस्य श्री.जयंत प्र.पाटील यांचा नियम 289 चा प्रस्ताव नाकारला होता. आज नियम 289 अन्वये प्रश्नोत्तराचा तास स्थगित करण्याची विनंती करण्यात आली आहे ती मी नाकारतो आणि प्रश्नोत्तराचा तास सुरु करतो.

----

2....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

( विरोधी पक्षाचे सन्माननीय सदस्य घोषणा देत असतात. )

**पृ.शी./मु.शी.**: तोंडी उत्तरे

**अमरावती शहराच्या पश्चिम बाजूने अकोलीवरुन जाणाऱ्या वळणरस्त्यासाठी चमननगर येथे पर्यायी आखणी**

**(१) * ७ प्रा. बी. टी. देशमुख , श्री. वसंतराव खोटरे , श्री.दिलीपराव सोनवणे : तारांकित प्रश्न क्रमांक ५०१५५ ला दिनांक ३ जून, २००९ रोजी दिलेल्या उत्तराच्या संदर्भात :** सन्माननीय **मुख्य मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) अमरावती शहराच्या पश्चिम बाजूने अकोलीवरुन जाणाऱ्या महानगरपालिकेच्या विकास योजनेतील वळण रस्त्यासाठी चमननगर (मौजे बडनेरा) भागात पर्यायी आखणी मध्ये अंतर्भूत असलेल्या खाजगी मालकीच्या १.२३५ हे.आर. जमिनीच्या भुसंपादनाची सद्य:स्थिती काय आहे,

(२) या जमिनीच्या भूसंपादनासाठी विलंब होण्याची कारणे काय आहेत,

(३) या कारणाच्या निवारणार्थ शासनाने काय उपाययोजना केलेली आहे ?

**श्री.भास्कर जाधव, श्री.अशोक चव्हाण यांच्याकरिता** : (१), (२) व (३) सदर भूसंपादन प्रकरणी कलम ६ ची सूचना प्रसिध्द झाल्यानंतर कलम ९ (१) अंतर्गत कार्यवाही सुरु करण्यात आली होती. मात्र, दरम्यान संपादन संस्थेने रस्त्याचे संरेखन बदलल्याने संयुक्त मोजणीची कार्यवाही नव्याने करण्यात आली आहे. मोजणीबाबतचा अहवाल दिनांक ४ जुलै, २००९ रोजी प्राप्त झाला आहे व कलम ६ अन्वये पूर्वी प्रसिध्द करण्यात आलेल्या सूचनेस शुध्दीपत्रक काढण्याची कार्यवाही सुरु आहे.

सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने लेखी उत्तरात पुढीलप्रमाणे दुरुस्ती करु इच्छितो. लेखी उत्तरातील तिसऱ्या ओळीमधील "संस्थेने रस्त्याचे संरेखन बदलल्याने" हे शब्द वगळून "संस्थेस रस्त्याच्या संरचनेत काही किरकोळ त्रुटी आढळल्याने" हे शब्द समाविष्ट करावेत.

( विरोधी पक्षाचे सन्माननीय सदस्य घोषणा देत असतात. )

प्रा.बी.टी.देशमुख : सभापती महोदय, सभागृहाचे कामकाज 10 मिनिटे तहकूब करण्यात यावे अशी माझी आपल्याला विनंती आहे. आम्हाला या प्रश्नावर उपप्रश्न विचारावयाचे आहेत. आम्हाला प्रश्न विचारण्याची संधी मिळाली पाहिजे. सभागृहातील गोंधळाच्या परिस्थितीमुळे आम्हाला प्रश्न विचारण्याची संधी मिळणार नसेल तर आपण हा प्रश्न राखून ठेवावा. कारण अनुशेषग्रस्त भागातील हा प्रश्न आहे. आम्हाला यावर उपप्रश्न विचारावयाचे आहेत. आपण आम्हाला प्रश्न विचारण्याची संधी द्यावी.

3...



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता.प्र.क्र.7.....

श्री.भास्कर जाधव : सभापती महोदय, या प्रश्नाला उत्तर देण्याची सरकारची तयारी आहे.

प्रा.बी.टी.देशमुख : सभापती महोदय, आपण 10 मिनिटांकरिता सभागृहाची बैठक तहकूब करावी. आम्हाला या प्रश्नावर उपप्रश्न विचारावयाचे आहेत. प्रश्नाला उत्तर मिळविण्याचा आमचा अधिकार आहे.

( विरोधी पक्षाचे सन्माननीय सदस्य घोषणा देत असतात. )

**सभापती** : सभागृहात गोंधळाची परिस्थिती असल्यामुळे सभागृहाची बैठक मी 15 मिनिटांकरिता तहकूब करीत आहे.

( सभागृहाची बैठक सकाळी 11.22 ते 11.37 वाजेपर्यंत स्थगित झाली. )

-------

यानंतर श्री.शिगम

अस्सुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**<u>स्थगितीनंतर</u>**

**(सभापतीस्थानी तालिका सभापती श्री. अरविंद सावंत)**

**तालिका सभापती** : सभागृहाची बैठक आणखी 15 मिनिटे तहकूब करण्यात येत आहे.

(सभागृहाची बैठक 11.37 ते 11.52 पर्यन्त तहकूब करण्यात आली.)

----

...नंतर श्री. भोगले....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**स्थगितीनंतर**

**(सभापतीस्थानी तालिका सभापती श्री.अरविंद सावंत)**

**तालिका सभापती** : सभागृहाची बैठक 10 मिनिटांसाठी तहकूब करण्यात येत आहे.

(सभागृहाची बैठक 11.52 ते 12.02 वाजेपर्यंत तहकूब करण्यात आली)

----

नंतर श्री.खर्चे..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**( स्थगिती नंतर )**

**( सभापतीस्थानी माननीय तालिका सभापती श्री अरविंद सावंत )**

श्री. विनोद तावडे : सभापती महोदय, आपण यापूर्वी देखील सभागृहाची बैठक 10 व 15 मिनिटे स्थगित केली. माझी अशी विनंती आहे की, सभागृहात उपस्थित झालेल्या मुद्याच्या अनुषंगाने जी चर्चा सुरु आहे त्यांना वेळ मिळावा तसेच सन्माननीय सदस्यांनाही आपली काही महत्वाची कामे असतील ती करता येतील म्हणून सभागृहाची बैठक 10 किंवा 15 मिनिटे स्थगित करण्याऐवजी जास्त वेळ स्थगित केली तर बरे होईल.

**तालिका सभापती** : ठीक आहे, मी सभागृहाची बैठक दुपारी 12.30 वाजेपर्यंत स्थगित करतो.

( सभागृहाची बैठक दुपारी 12.03 ते 12.30 पर्यंत स्थगित झाली )

यानंतर श्री. जुन्नरे ...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**स्थगितीनंतर**

**(सभापतीस्थानी तालिका सभापती डॉ. वसंत पवार )**

**तालिका सभापती** : सभागृहाची बैठक 15 मिनिटांसाठी तहकूब करण्यात येत आहे.

(सभागृहाची बैठक 12.35 ते 12.50 वाजेपर्यंत तहकूब करण्यात आली)

----

यानंतर श्री. गायकवाड...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**<u>स्थगिती नंतर</u>**

**( सभापतीस्थानी तालिका सभापती श्री. अरविंद सावंत )**

**तालिका सभापती** : सभागृहाची बैठक आणखी 20 मिनिटांसाठी स्थगित करण्यात येत आहे.

( सभागृहाची बैठक 1 वाजून 1 मिनिटांनी, 20 मिनिटांसाठी स्थगित करण्यात आली )

------

नंतर श्री.सुंबरे

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

KBS/KGS/MMP. श्री. गायकवाड नंतर --- 1:15 / 1:16

( सभागृह स्थगितीनंतर --- )

( सभागृहाची बैठक 1 वाजून 16 मिनिटांनी 'बेल' न वाजता तसेच सभापतींचे आगमन सभागृहात होत असताना मार्शलद्वारा होणारी घोषणा न होताच सभागृहामध्ये माननीय उपसभापती सभापती आसनावर स्थानापन्न झाले.

**<u>सभापतीस्थानी - माननीय उपसभापती</u>**

काही सन्माननीय सदस्य (खाली बसूनच) : सभापती महोदय, सभागृहाची बैठक सुरू होण्यापूर्वी वाजणारी इशारा घंटी न वाजता तसेच मार्शलद्वारा आपण सभागृहात आल्याचा पुकारा न होताच आपण सभागृहात आला आहात. त्यामुळे आम्हाला उभे राहून आपला मान राखता आला नाही. शेवटी हा आपल्या मानाचा प्रश्न आहे. यामध्ये संकेताचा देखील भंग होत आहे.

**उपसभापती** : मी आता सभापतीस्थानी आसनस्थ झालो आहे. मी येथे आलो आहे तेव्हा या सर्व प्रथा पाळल्या गेल्या आहेत असे आपण समजावे. तरी आता आपण आता सभागृहाच्या कामकाजास सुरूवात करू या. यानंतर कागदपत्रे सभागृहासमोर ठेवण्यात येतील. ...

श्री. नितीन गडकरी : सभापती महोदय, मघाशी सभागृहामध्ये जो महत्त्वाचा प्रस्ताव, सभागृहापुढील सर्व कामकाज स्थगित ठेवून तातडीने चर्चा घडवून आणण्यासाठी आम्ही दिला होता त्या विषयावरच सभागृहाची बैठक तहकूब करण्यात आली होती. त्यावेळी देखील मी आपल्याला सांगितले होते की, राम प्रधान समितीच्या अहवालाची प्रत आताच मला मिळाली आहे आणि ती प्रत एका पांढरे कपडे परिधान केलेल्या माणसाने मला आताच आणून दिली आहे. आता हे सांगताना मी माननीय उपमुख्यमंत्री वा अन्य कोणावरही कोणताही आरोप करीत नाही. मात्र हे खरे आहे की, मला त्या अहवालाची प्रत अशा प्रकारे कोणी दिली असेल तर हा काही तरी राजकीय कट असू शकतो आणि तसे काही असेल तर मला त्याची माहिती नाही. पण मला जी प्रत दिली गेली होती ती प्रधान समितीच्या अहवालाचीच प्रत होती. आता मला देण्यात आलेली वा मला मिळालेली अहवालाची प्रत ही सत्य आहे की असत्य आहे ? असत्य असेल तर त्याबाबत सरकारने, माननीय मुख्यमंत्र्यांनी खुलासा येथे केला पाहिजे. आता त्या अहवालातील कंटेंटस् मूळ अहवालाबरहुकूम असतील तर तेही आपण पाहिले पाहिजे आणि ते पाहून सरकारने वाटल्यास याबाबत खुलासा करावा. आम्ही सभागृहाला वारंवार हे सांगत आहोत. वस्तुत: मागील नागपूर अधिवेशनामध्येच या सभागृहात राम प्रधान समिती नेमण्यात आली होती आणि त्यावेळी माननीय सभापतींनी सांगितले

.... के 2 ..



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. गडकरी ....

होतेकी, ही बाब आता माझ्या कस्टडीमध्ये आहे. मात्र माननीय मुख्यमंत्री सदरहू समितीच्या अहवालाची जी प्रत आम्हाला मिळाली आहे वा बाहेर ती सर्व लोकांमध्ये प्रसृत झालेली आहे त्याबाबत 'मला माहिती नाही, मला माहिती नाही, मी ती पाहिलेली नाही, मी वाचलेली नाही' असे सांगत आहेत. सभापती महोदय, प्रधान समितीचा अहवाल इतका गोपनीयय आहे म्हणून माननीय मुख्यमंत्री सांगत आहेत तर मग त्याची झेरॉक्स प्रत आमच्या हाती आली कशी ? हा या गोपनियतेचा भंग कोणी केला ? यामध्ये कोणते आणि कोणाचे राजकारण आहे ? आयबीएम लोकमत या टीव्ही वाहिनीवर हे सारे आलेले आहे. आणि या वाहिनीचे मालक तर आपल्या मंत्रिमंडळामध्ये एक मंत्री आहेत. तर मग त्यांनी या गोपनीयतेचा भंग केला आहे काय ? त्यांना आपण याबाबत विचारले पाहिजे. वस्तुत: याबाबत सरकारने ताबडतोब खुलासा करावा अशी आमची आग्रहाची मागणी आहे. काल देखील माननीय मुख्यमंत्र्यांकडे या अहवालाची एक प्रत देऊन सन्माननीय सदस्य श्री.दिवाकर रावते आणि विधानसभा सदस्य सन्माननीय श्री.सुभाष देसाई यांनी मागणी केली होती. माननीय मुख्यमंत्र्यांनी देखील हे मान्य केलू आहे की, या दोन्ही सदस्यांनी त्यांना अहवालाची एक प्रत दिली आहे आणि पुढे त्यांनी सांगितले की, त्यांनी ही बाब माननीय गृहमंत्र्यांकडे सोपविली आहे आणि तेच याबाबत निवेदन करणार आहेत. सभापती महोदय, हे निवेदन तुम्ही उद्या करणार असाल तर तसे स्पष्ट सांगावे. पण माननीय मुख्यमंत्री वा गृहमंत्री यासाठी निश्चित अशी तारीख देत नाहीत म्हणून आम्ही या संदर्भात आपले संरक्षण मागितले. आम्ही आपल्याकडे न्याय मागितला आहे. सभागृहात नेमल्या गेलेल्या समितीच्या अहवालाची प्रत आम्हाला सभागृहात न मिळता बाहेरून मिळते आहे हे बरोबर नाही. आता या ठिकाणी माननीय मुख्यमंत्री आणि माननीय उपमुख्यमंत्री हे दोघेही उपस्थित आहेत. तेव्हा त्यांनी येथे सांगावे की, आम्ही त्यांच्याकडे दिलेली प्रत ती खरी प्रत आहे किंवा नाही हे तपासून ते आम्हाला केव्हा सांगणार आहेत ? आज सायंकाळपर्यंत किंवा उद्या सकाळपर्यंत तरी ते याबाबत सांगणार आहेत का ? सभापती महोदय, हे सार्वभौम सभागृह आहे आणि या सभागृहामध्ये जाहीर केलेल्या समितीच्या अहवालाची प्रत आम्हाला येथे न मिळता कोणी तरी रस्त्यावरील एका माणसाकडून मिळते, बाहेर प्रसिद्धी माध्यमांना देखील ती मिळते, टीव्ही वर त्यासंबंधात दाखविले जाते. हे कितपत योग्य आहे, न्याय्य आहे ? सभापती महोदय, माननीय उपमुख्यमंत्री महोदयांना

..... के 3 ...



KBS/KGS/MMP. श्री. गायकवाड नंतर --- 1:15 / 1:16

मी सांगू इच्छितो की, आता आपण वाजता आहात तीच प्रत त्या अहवालाची आहे. सभापती महोदय, तेव्हा आमची आग्रहाची मागणी आहे की, माननीय मुख्यमंत्र्यांनी याबाबत तातडीने येथे खुलासा करावा आणि जोपर्यंत तो खुलासा होत नाही तोपर्यंत आम्हाला न्याय मिळणार नाही, आमच्यावर अन्याय होणार आहे. तरी तो खुलासा अगोदर होऊ द्यात आणि त्यानंतरच इतर कामकाज आपण घ्यावे अशी आमची आपल्याला विनंती आहे.

श्री. अशोक चव्हाण : सभापती महोदय, मी या संदर्भात सुरूवातीलाच स्पष्ट केले होते की, माननीय विरोधी पक्षनेत्यांनी आणि इतर सन्माननीय सदस्यांनी माझ्याकडे प्रधान समितीच्या अहवालाची म्हणून जी प्रत दिली आहे ती मूळ अहवालाशी सुसंगत आहे की नाही, ती मूळ अहवालाचीच प्रत आहे की नाही हे तपासून पहावे लागेल. त्यानंतरच त्यासंबंधात पुढील कारवाई अपेक्षित आहे. शेवटी प्रधान समितीचा अहवाल हा गोपनीय आहे आणि त्यामुळेच सन्माननीय सदस्यांनी माझ्याकडे दिलेली त्याची प्रत ही योग्य आहे की अयोग्य आहे ते तपासल्याशिवाय शासन त्यावर आपला अभिप्राय देऊ शकत नाही. मी ती प्रत माननीय गृहमंत्र्यांकडे दिलेली आहे आणि ते त्यासंबंधात तपासणी करून खुलासा करतील. सोमवार पर्यंत माननीय गृहमंत्री याबाबत निवेदन करतील. स्वत: गृहमंत्रीच म्हणाले आहेत की, मी याबाबत सोमवारपर्यंत सभागृहात आपली भूमिका स्पष्ट करीन. ...

( गोंधळ )

श्री. नितीन गडकरी : सभापती महोदय, सोमवारपर्यंत कशाला ? आज का नाही ? एवढा वेळ यासाठी कशाला पाहिजे ? ...

श्री. अशोक चव्हाण : सभापती महोदय, सभागृहामध्ये ते आपली भूमिका स्पष्टपणे मांडणार आहेत. ...

( विरोधी सदस्य 'वेल'मध्ये येऊन घोषणा देऊ लागतात. ...गोंधळ )

**उपसभापती** : मी सन्माननीय सदस्यांना सांगू इच्छितो की, मी उभा आहे,. आपण सर्वांनी आपापल्या जागा ग्रहण कराव्यात. ...

( गोंधळ )

.....के 4 ...



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**उपसभापती** : आता कागदपत्रे सभागृहासमोर ठेवण्यात येतील. ..

( गोंधळ )

**पृ.शी./मु.शी.**: कागदपत्रे सभागृहासमोर ठेवणे.

--

श्री. छगन भुजबळ (उप-मुख्यमंत्री) : महोदय, अकोला-वाशिम-बुलढाणा जिल्हा माथाडी व असंरक्षित कामगार मंडळ, अकोला यांचा सन 2000-01, 2001-02 व 2002-03 चा वार्षिक अहवाल मी आपल्या अनुमतीने सभागृहासमोर ठेवतो.

**उपसभापती** : वार्षिक अहवाल सभागृहासमोर ठेवण्यात आले आहेत.

( गोंधळ )

श्री. छगन भुजबळ : महोदय, अमरावती माथाडी व असंरक्षित कामगार मंडळ, अमरावती यांचा सन 2004-05, 2005-06 व 2006-07 चा वार्षिक अहवाल मी आपल्या अनुमतीने सभागृहा समोर ठेवतो.

**उपसभापती** : वार्षिक अहवाल सभागृहासमोर ठेवण्यात आले आहेत.

( गोंधळ )

( यानंतर श्री. सरफरे .... एल 1 ..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ.शी./मु.शी.**: सन 2009-2010 करिता खर्चाचे पूरक विवरणपत्र सादर करणे

(गोंधळ)

(विरोधी पक्षाचे माननीय सदस्य "वेल" मध्ये उभे राहून घोषणा देतात.)

श्री. विजय वडेट्टीवार (वित्त राज्यमंत्री) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने सन 2009-2010 करिता खर्चाचे पूरक विवरणपत्र सभागृहाला सादर करीत आहे. आणि तसे करीत असताना मी आपल्या निदर्शनास आणू इच्छितो की, भारतीय संविधानाच्या अनुच्छेद 205 आणि 203 (3) मधील तरतुदीस अनुलक्षून मिळालेल्या अधिकारानुसार महाराष्ट्राचे राज्यपाल यांनी सन 2009-2010 च्या खर्चाच्या पूरक विवरणपत्रावर चर्चा करण्याकरिता सभागृहाला शिफारस केली आहे.

**उपसभापती** : सन 2009-2010 मधील खर्चाचे पूरक विवरणपत्र सभागृहाला सादर झाले आहे. सदरहू खर्चाच्या पूरक विवरणपत्राच्या प्रती सदस्यांसाठी राखून ठेवलेल्या टपालखणांमध्ये वितरीत करण्यात येत आहेत.

(गोंधळ)

----

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ.शी.**: संत गजानन महाराजांच्या समाधी शताब्दी सोहळयाला सुरुवात होऊनही शेगांवचा विकास आराखडा अंमलात न येणे

**मु.शी.**: संत गजानन महाराजांच्या समाधी शताब्दी सोहळयाला सुरुवात होऊनही शेगांवचा विकास आराखडा अंमलात न येणे यासंबंधी सर्वश्री. गोपीकिसन बाजोरिया, दिवाकर रावते, डॉ. श्रीमती नीलम गोऱ्हे,वि.प.स.यांनी दिलेली लक्षवेधी सूचना

(गोंधळ)

(विरोधी पक्षाचे माननीय सदस्य "वेल" मध्ये उभे राहून घोषणा देतात.)

(लक्षवेधी सूचना मांडण्यात आली नाही)

----

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ.शी./मु.शी.**: माननीय राज्यपालांच्या अभिभाषणावर चर्चा

(चर्चा पुढे चालू...)

**उपसभापती** : माननीय राज्यपालांच्या अभिभाषणावरील चर्चेला आता सुरुवात करु या.

(गोंधळ)

श्री. छगन भुजबळ (उप मुख्यमंत्री) : सभापती महोदय, माननीय राज्यपालांच्या अभिभाषणावरील चर्चेचा कालावधी उद्यापर्यंत वाढविण्यात यावा अशी मी विनंती करतो.

----

**पृ.शी.**: डॉ. बाबासाहेब आंबेडकर तंत्रशास्त्र विद्यापीठ आणि महाराष्ट्र विद्यापीठ (सुधारणा) विधेयक

L.C. BILL NO. XIII OF 2009

(A BILL FURTHER TO AMEND THE DR. BABASAHEB AMBEDKAR TECHNOLOGICAL UNIVERSITY ACT, 1989 AND THE MAHARASHTRA UNIVERSITIES ACT, 1994)

(गोंधळ)

श्री. छगन भुजबळ (उप मुख्यमंत्री) : सभापती महोदय, सन 2009 चे वि.प.वि. क्रमांक 13 डॉ.बाबासाहेब आंबेडकर तंत्रशास्त्र विद्यापीठ अधिनियम, 1989 व महाराष्ट्र विद्यापीठ अधिनियम, 1994 यांमध्ये आणखी सुधारणा करण्याकरिता विधेयक मांडण्यासाठी मी सभागृहाची अनुमती मागतो.

प्रश्न मतास टाकून संमत झाला.

**उपसभापती** : अनुमती देण्यात आली आहे.

श्री. छगन भुजबळ : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने सन 2009 चे वि.प.वि. क्रमांक 13 मांडतो.

**उपसभापती** : विधेयक मांडण्यात आले आहे.

----

12-09-2009 ( असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही ) L 4

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

DGS/ KGS/ MMP/

**पृ.शी.**: प्रकल्पबाधित व्यक्तींचे पुनर्वसन (सुधारणा) विधेयक

L.C. BILL NO. VIII OF 2009

(A BILL TO AMEND THE MAHARASHTRA PROJECT AFFECTED PERSONS REHABILITATION ACT, 1999)

(गोंधळ)

(विरोधी पक्षाचे माननीय सदस्य "वेल" मध्ये उभे राहून घोषणा देतात.)

श्री. छगन भुजबळ (उप मुख्यमंत्री) : सभापती महोदय मी आपल्या अनुमतीने सन 2009 चे वि.प.वि. क्रमांक 8 महाराष्ट्र प्रकल्पबाधित व्यक्तींचे पुनर्वसन अधिनियम, 1999 यात सुधारणा करण्याकरिता विधेयक विचारात घेण्यात यावे, असा प्रस्ताव मांडतो.

प्रश्न मतास टाकून संमत झाला.

गोंधळ

**उपसभापती** : विधेयक विचारात घेण्यात आले आहे. आता विधेयक खंडश: विचारात घेण्यात येईल.

खंड 2 ते 3 विधेयकाचे भाग झाले.

खंड 1, संपूर्ण शीर्षक व हेतुवाक्य विधेयकाचे भाग झाले.

श्री. छगन भुजबळ : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने सन 2009 चे वि.प.वि. क्रमांक 8 संमत करण्यात यावे, असा प्रस्ताव मांडतो.

प्रश्न मतास टाकून संमत झाला.

गोंधळ

**उपसभापती** : सन 2009 चे वि.प.वि. क्रमांक 8 संमत झाले आहे.

सभागृहापुढील कामकाज संपलेले आहे. सभागृहाची बैठक आता स्थगित होऊन उद्या गुरुवार, दिनांक 10.12.2009 रोजी सकाळी 11.00 वाजता पुन: भरेल.

(सभागृहाची बैठक 1 वाजून 28 मिनिटांनी गुरुवार, दिनांक 10.12.2009 च्या सकाळी 11.00 वाजेपर्यंत स्थगित झाली.)

----

अमुद्रित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही